# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २०/०१/२०२६ (मंगळवार )**

## नागपुर ग्रामीण जिल्हयात ऑपरेशन मुस्कान अंतर्गत हरवलेल्या/पळविलेल्या, (अपहरण, अपनयन) बालकांचा शोध घेण्यासाठी राबविण्यात येत आहे शोध मोहीम.

मा. अपर पोलीस महासंचालक, महीला व बाल अपराध प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशाने दिनांक २०/०१/२०२६ ते २०/०२/२०२६ या कालावधीत संपुर्ण राज्यात हरवलेल्या/ पळविलेल्या ( अपहरण, अपनयन ) बालकांचा शोध घेण्यासाठी ऑपरेशन मुस्कान शोध मोहीम राबवण्यात येत आहे. नागपुर ग्रामीण जिल्यात या मोहीमे अंतर्गत हरविलेल्या/ पळविलेल्या प्रकरणांमधील बालकांचा तसेच आश्रमगृह, अशासकीय संस्था, रेल्वे स्थानके, बसस्थानके, रस्त्यावर भीक मागणारी बालके, बाल मजुरी मध्ये अडकलेल्या बालकांचा सुध्दा शोध घेण्यात येत आहे. नमुद मोहीमे अंतर्गत बालकांचा शोध घेण्याकरीता विविध शोध पथके नेमण्यात आले असुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध विभाग, नागपुर ग्रामीण (Anti Human Trafficking Unit), तसेच प्रत्येक पोलीस स्टेशन ला १ असे एकुण २१ मिसींग शोध पथक स्थापन करण्यात आले.

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नागरिकांनी हरवलेल्या किंवा पळवलेल्या बालकांच्या शोधात सहकार्य करावे. रेल्वे स्थानके, बसस्थानके, रस्त्यावर भीक मागणारी ,बाल मजुरी मध्ये अडकलेली अशा संशयित बालकांबाबत माहिती तात्काळ खालील नमुद क्रमांकावर दयावी किंवा नजिकच्या पोलीस स्टेशनला माहीती दयावी.**

**संपर्क क्रमांक — डायल ११२ , पोलीस नियत्रंण कक्ष — ७०६६११२१००**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, आरोपी अटक, केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक १९/०१/२०२६ रोजी केळवद पोलीस पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी बिहाडा फाटा येथे नाकाबंदी केली असता पाढुर्णा कडुन मोटर सायकल एम.एच. ४० ए. एल. ७७८२ येतांना दिसली. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुगंधीत तंबाखु मिळुन आला. वाहन चालक **आरोपी नामे कैलास धर्मराज गायकवाड , वय ४५ वर्ष रा. गादा पोस्ट अजनी, ता.कामठी जि.नागपुर** याचे ताब्यातुन **प्रतिबंधीत सुगंधित तंबाखु ५० किलो एकुण किंमती २५,०००/— रूपये, तसेच** मोटर सायकल एम.एच ४०ए एल ७७८२ **किंमती .४०,०००/— रूपये असा एकुण ६५,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथेभारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.**

## जामठा स्टेडियम येथे भारत विरूध्द न्युझीलॅन्ड टी—२० क्रिकेट सामन्याचे अनुषंगाने बुटीबोरी कडून नागपूरकडे जाणारी जड वाहतुक वळविल्याबाबत

दि. २१/०१/२०२६ रोजी भारत विरूध्द न्युझीलॅन्ड टी—२० क्रिकेट सामन्याचे व्हि.सी.ए. जामठा येथे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर सामना पाहण्याकरिता मोठ्या प्रमाणात नागरीक आपले वाहनाने जामठ्याकडे जाणार आहेत. त्यामुळे वर्धा रोडवर वाहतुकीची कोंडी होवून अपघात प्रवण परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. रस्त्यावर वाहतुकीची कोंडी निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांकित अपघात होवू नयेत, त्यावर प्रतिबंध व्हावा याकरीता याकरीता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशान्वये **दिनांक २१.०१.२०२६ चे ११.०० वा. पासुन ते क्रिकेट सामना संपे पर्यंत** बुटीबोरी कडून नागपूरकडे जाणारी जड वाहतुक खालील प्रमाणे वळविण्यात आली आहे.

**वर्धा ते नागपूरकडे बुटीबोरीमार्गे जाणारी जड वाहतुक** ही वर्धा रोड—एसीसी चौक अंडरपास/सर्विस रोड डाविकडे—अग्निशमन कार्यालय—इंडोरामा कंपनी—उजवीकडे वळून सालईधाबा—दाताळा मार्गे समृध्दी महामार्गाने नागपूर कडे जाईल.

**चंद्रपूर ते नागपूरकडे बुटीबोरीमार्गे जाणारी जड वाहतुक** ही वाय पॉईंट डावीकडे वळून वर्धा रोड—एसीसी चौक अंडरपास/सर्विस रोड डाविकडे—अग्निशमन कार्यालय—इंडोरामा कंपनी—उजवीकडे वळून सालईधाबा—दाताळा मार्गे समृध्दी महामार्गाने नागपूर कडे जाईल.

## पोलीस स्टेशन खापा आणि महसुल अधिकरी यांची संयुक्तपणे गोसेवाडी रेती घाटास भेट

दिनांक २०/०१/२०२६ रोजी पोलीस स्टेशन खापा चे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक श्री किशोर भुजाडे आणि श्री प्रशांत गोविंदवार, नायब तहसीलदार सावनेर यांनी संयुक्त कारवाई अंतर्गत पोलीस स्टेशन खापा हद्दीतील गोसेवाडी रेती घाटास भेट देऊन पाहणी केली. सदर भेटीचा उद्देश रेती उत्खनन व वाहतूक याबाबत शासनाने दिलेल्या नियमांचे पालन होत आहे की नाही, याची खातरजमा करणे हा होता.

या संयुक्त पाहणीदरम्यान रेती घाटावरील परिस्थिती, परवानगीप्राप्त उत्खनन, वाहतूक व्यवस्था तसेच कोणत्याही प्रकारचे अवैध उत्खनन सुरू आहे काय, याची तपासणी करण्यात आली. सदर ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले असल्याचे आढळून आले, सीसीटीव्ही कॅमेरांच्या अनुषंगाने थेट पाहणी करण्याची यंत्रणा तात्काळ उपलब्ध करून देण्याच्या सूचना रेती घाट व्यवस्थापकाला देण्यात आल्या.



## हद्दपार आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कन्हान :—** दिनांक १९/०१/२०२६ रोजी कन्हान पोलीस हे पोलीस स्टेशन परिसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारा कडुन माहीती प्राप्त झाली की, नागपूर जिल्हयातुन तिन महीन्या करीता हददपार करण्यात आलेला इसम नामे **शुभम राजेश सोमकुंवर, वय २४ वर्ष, रा. सिहोरा, कन्हान हा त्याचे घरी हजर आहे.** मिळालेल्या माहीतीवरून पोलीसंनी तात्काळ त्याचे घरी जावुन तपासणी केली असात हद्दपार इसम घरी हजर मिळुन आला. त्याची विचारपुस केली असता त्याने कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता नागपूर जिल्हयात प्रवेश करून हद्दपार आदेशाचे उल्लंघन केले असल्याचे निष्पन्न झाले. **नमुद आरोपीवर कलम १४२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## प्रतिबंधीत नायलॉन मांजा ने पतंग उडविणाऱ्या आरोपीकडुन दंड वसुल

**पोस्टे कन्हान :—** दिनांक १४/०१/२०२६ रोजी कन्हान पोलीसांनी पिपरी रामनगर येथील गाडेघाट रोड येथे **आरोपी अक्षय जयराम कोरवते, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. ०७, रामनगर, पिपरी, कन्हान ता. पारशिवनी** हा नायलॉन मांजानी पतंग उडवित असल्याने त्याचे वर कारवाई करत गुन्हा नोंद करण्यात आला होता. तसेच **मा उच्च न्यायालयाच्या दिनांक १२/०१/२०२६ च्या आदेशान्वये पोलीसांनी वर नमुद आरोपी याला २५,०००/— रूपये दंड भरणेबाबत नोटीस बजावलेली होती. सदर कारवाईचा अहवाल कन्हान पोलीसांनी महसुल विभागाकडे पाठविला असता आज दिनांक २०/०१/२०२६ रोजी नमुद आरोपीकडुन दंडाची रक्कम २५,०००/— रूपये वसुल करण्यात आली आहे. मा उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये नमुद दंडाची रक्कम शासकीय खजिना दाखल करण्यात आली आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७३१ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २०/०१/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ७३१ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३७ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण १०१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २७ आणि पोलीस

स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण १३० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २८ आरोपी अशा एकुण ६० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २५ आरोपी अशा एकुण १४२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५५ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १६८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७३१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने